मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ,
पुणे महानगरपालिका
ठराव क्र. :- १/३९९
दिनांक :- १७/०९/२०२१

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था-४/५३४४
दिनांक :- १७/०९/२०२१

**- आ ज्ञा प त्र –**

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील " वाहतूक व्यवस्थापक" या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.१/१४३, दि.१४/०९/२०२१.

२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/३९५ दि. १७/०९/२०२१

पुणे महानगरपालिका प्रशासनाचे मोटार वाहन विभागाकडील "वाहतूक व्यवस्थापक" वे.श्रे.रू.९३०० ते ३४८०० + ५४०० ग्रेड पे + (मान्य भत्ते) या पदावर 'अधिक्षक वाहतूक' वे.श्रे.रू.९३०० ते ३४८००+ ४३०० ग्रेड पे + (मान्य भत्ते) या निम्न पदावरून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये संदर्भ क्र. १ व २ चे मान्यतेनुसार खालील अधिकारी यांची त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे या आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून पदोन्नतीने हंगामी (तदर्थ पदोन्नती) नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व जातीचा प्रवर्ग | नेमणुकीचा गट | तदर्थ पदोन्नतीचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. चव्हाण ऋषिकेश बाबासाहेब (अ.ज.) | सेवाज्येष्ठतेने | मोटार वाहन विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |

१) उपरोक्त तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामन्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ नुसार निर्देशांचे अधिन राहून करण्यात येत आहे.

२) उपरोक्त अधिकारी यांची 'वाहतूक व्यवस्थापक' पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(अ) सदर अधिकाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

(ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

३) उपरोक्त नियुक्त्या मे. राज्य शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत जो काही निर्णय देईल त्यानुसार मागासप्रवर्गातील अधिकारी यांच्या पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

४) उपरोक्त अधिकारी यांनी **'वाहतूक व्यवस्थापक'** या पदावर रुजू झाल्याबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावे.

५) संबंधित अधिकारी यांना मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

६) उपरोक्त अधिकारी यांना मनपा सेवाविनियम व वेळोवेळी शासन पारित करतील ते शासन निर्णय लागू होतील.

७) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरुर ती पुढील कार्यवाही करावी.

Rat

(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
17/9/2021

**प्रत - संबंधित खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना--